IndusInd Bank

April 25, 2026

National Stock Exchange of India Limited (Symbol: INDUSINDBK)
BSE Limited (Scrip Code: 532187)
Luxembourg Stock Exchange

Madam/ Dear Sir,

Sub.: **Newspaper Clippings**

Ref.: **Regulation 30 and 47(1) of the SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015**

Please find enclosed herewith the newspaper clippings pertaining to the Audited Consolidated and Standalone Financial Results of the Bank for the quarter and financial year ended March 31, 2026 published by the Bank.

This intimation is also being uploaded on the Bank's website at www.indusind.bank.in

We request you to take the information on record.

Thanking you,

Yours faithfully,
For IndusInd Bank Limited

ANAND KUMAR DAS
Digitally signed by ANAND KUMAR DAS
Date: 2026.04.25 11:47:06 +05'30'

Anand Kumar Das
Company Secretary

Encl: a/a

Solitaire Corporate Park Office: IndusInd Bank Limited, Building No.7, Ground floor, Solitaire Corporate Park, Andheri –Ghatkopar Link Road, Chakala Andheri (E), Mumbai – 400 093, India, Tel: (022) 66412442

Registered Office: 2401 Gen. Thimmayya Road, Pune 411001, India
Contact us:(020) 2634 3201| **Email us:** reachus@indusind.com | **Visit us**: www.indusind.bank.in
CIN: L65191PN1994PLC076333

संघाला आत्मविश्वास, एकाग्रता, शिस्तीची गरज

मुंबई इंडियन्सचे प्रशिक्षक जयवर्धने यांची प्रतिक्रिया

पीटीआय, मुंबई

यंदाच्या 'आयपीएल' स्पर्धेत अपयशाच्या गर्तेत अडकलेल्या मुंबई इंडियन्सच्या अपयशाची कारणमीमांसा करताना मुंबई इंडियन्सचे प्रशिक्षक महेला जयवर्धने यांनी सूर्यकुमार यादव आणि हार्दिक पंड्या यांसारख्या प्रमुख भारतीय खेळाडूंना थकवा जाणवत असल्याचे कारण फेटाळून लावले आहे. संघाच्या खराब कामगिरीसाठी ट्वेन्टी-२० विश्वचषकाचा थकवा कारणीभूत नसून, संघाने उर्वरित सात सामन्यांत आपली लय आणि आत्मविश्वास परत मिळवण्यावर लक्ष केंद्रित करणे आवश्यक असल्याचे जयवर्धने म्हणाले.

गुरुवारी चेन्नई सुपर किंग्जविरुद्ध झालेल्या सामन्यात मुंबई इंडियन्सचा १०३ धावांनी मोठा पराभव झाला. या हंगामातील सात सामन्यांमधला हा त्यांचा पाचवा पराभव असून धावांच्या फरकाने झालेला हा आतापर्यंतचा सर्वात मोठा पराभव आहे. मुंबई इंडियन्स संघाची कामगिरी पाहिली तर कर्णधार हार्दिक पंड्याने सहा सामन्यांत केवळ तीन बळी घेतले असून ९७ धावा केल्या आहेत. सूर्यकुमार यादवने सात सामन्यांत १५६ धावा केल्या आहेत. इतकेच नाही तर जसप्रीत बुमरा (दोन बळी) आणि तिलक वर्मा (१८१ धावा) यांनाही अपेक्षित प्रभाव पाडता आलेला नाही.

सांघिक अपयश

प्रशिक्षक जयवर्धने यांनी या वेळी खेळाडूंचे वैयक्तिक अपयश विसरण्यास सांगितले. क्रिकेट हा सांघिक खेळ आहे. त्यामुळे आम्हाला सांघिक अपयश आले आहे हे सर्वात महत्त्वाचे असे जयवर्धने म्हणाले.

"साहजिकच त्यांनी हार्दिक पंड्या, जसप्रीत बुमरा, तिलक वर्मा, सूर्यकुमार यादव या सर्वांचा बचाव केला. सुरुवातीच्या काही सामन्यांत हार्दिकने चांगली गोलंदाजी केली होती. संपूर्ण संघ म्हणून आमची कामगिरी खालावली आहे, त्यासाठी केवळ एका खेळाडूला जबाबदार धरता येणार नाही. मला कोणा एकाचे नाव घ्यायचे नाही, पण संघ म्हणून आम्ही अपयशी ठरलो आहोत," असे जयवर्धने यांनी सांगितले. अष्टपैलू मिचेल सँटनर जखमी असल्याचे त्यांनी मान्य केले. "क्षेत्ररक्षण करताना एक कठीण झेल घेताना त्याच्या खांद्याला दुखापत झाली आहे. डोक्यालाही थोडा मार बसला आहे. ड्रेसिंग रूममध्ये त्याला चक्कर येऊ लागल्याने स्कॅनिंगसाठी नेण्यात आले. वैद्यकीय अहवाल आल्यानंतरच त्याच्या दुखापतीविषयीचे गांभीर्य समोर येईल," असेही जयवर्धने म्हणाले.

व्यावसायिकता आणि सातत्य

सध्याच्या काळात प्रत्येक खेळाडू हा व्यावसायिक आहे. विश्वचषक खेळलेले अनेक खेळाडू विश्रांती घेऊनच 'आयपीएल' खेळायला आले आहेत. त्यामुळे खेळाडू खराब कामगिरीसाठी थकव्याचे कारण देतील असे मला वाटत नाही. प्रश्न आमच्या लय आणि सातत्याचा आहे. गोलंदाजीमध्ये सुधारणेची गरज आहेच, पण फलंदाजीतही आम्ही सातत्य राखू शकलेलो नाही, असे प्रशिक्षक जयवर्धने यांनी चेन्नईविरुद्धच्या पराभवानंतर पत्रकारांशी बोलताना सांगितले. "आम्हाला स्पर्धेत टिकून राहण्यासाठी योग्य कामगिरी करावी लागेल. जर आम्ही आमचा सर्वोत्तम खेळ केला तर नक्कीच संधी आहे. यासाठी पुढील सात सामन्यांसाठी आत्मविश्वास, एकाग्रता आणि शिस्त असणे अत्यंत गरजेचे आहे. ही जबाबदारी आता खेळाडूंची आहे," असेही जयवर्धने म्हणाले.

आजचे 'आयपीएल' सामने

दिल्ली कॅपिटल्स वि. पंजाब किंग्ज
- वेळ : दुपारी ३.३० वा.

राजस्थान रॉयल्स वि. सनरायजर्स हैदराबाद
- वेळ : सायं. ७.३० वा.

- थेट प्रक्षेपण : स्टार स्पोर्ट्स १, १ हिंदी, जिओहॉटस्टार ॲप.

बंगळूरुचा चमकदार विजय

बंगळूरु : विराट कोहली (८१), देवदत्त पडिक्कल (५५) आणि कृणाल पंड्या (नाबाद २३) यांच्या दमदार फलंदाजीच्या जोरावर रॉयल चॅलेंजर्स बंगळूरुने शुक्रवारी झालेल्या 'आयपीएल' सामन्यात गुजरात टायटन्सचा पाच गडी राखून पराभव केला. बंगळूरुच्या प्रत्येक फलंदाजाने षटकाराचे योगदान देत संघाचा विजय झटपट साकार केला. बंगळूरुने १८.५ षटकांत ५ बाद २०६ धावा केल्या.

तत्पूर्वी, बी. साई सुदर्शनने ट्वेन्टी-२० क्रिकेटच्या आक्रमक शैलीला छेद देणारे, पण तरीही अत्यंत प्रभावी असे शानदार शतक (५८ चेंडूंत १००) झळकावले. त्याच्या या खेळीच्या जोरावर गुजरातने बंगळूरुविरुद्ध ३ बाद २०५ अशी आव्हानात्मक धावसंख्या उभी केली. सुदर्शन आणि कर्णधार शुभमन गिल (३२) यांची १२८ धावांची सलामी गुजरातच्या डावाचे वैशिष्ट्य ठरली.

आशियाई क्रीडा स्पर्धेच्या आयोजनातही भारताचे स्वारस्य

नवी दिल्ली : भारताने २०३६च्या ऑलिम्पिक स्पर्धांच्या यजमानपदापाठोपाठ २०३८ च्या आशियाई क्रीडा स्पर्धेचे यजमानपद मिळविण्यासाठी स्वारस्य दाखवले आहे. यासाठी पहिले पाऊल टाकताना अधिकृतपणे 'स्वारस्य पत्र' देखील सादर केले आहे. भारतीय ऑलिम्पिक संघटनेच्या (आयओए) एका वरिष्ठ अधिकाऱ्याने ही माहिती दिली असून, हे भारताला जागतिक क्रीडा स्पर्धांचे केंद्र बनवण्याच्या धोरणातील हे एक महत्त्वाचे पाऊल मानले जात आहे.

'आयओए'ने अलिकडेच २०३८ च्या खेळांच्या यजमानपदासाठीचे आपले स्वारस्य पत्र आशियाई ऑलिम्पिक परिषदकडे (ओसीए) सोपवले आहे. चीनमधील सान्या शहरात २१ एप्रिल रोजी झालेल्या कार्यकारी मंडळाच्या बैठकीत या प्रस्तावावर चर्चा करण्यात आली. सध्या येथे आशियाई बीच क्रीडा स्पर्धा सुरू आहेत. भारताने स्वारस्य पत्र सादर केल्याची आणि त्यावर चर्चा झाल्याच्या वृत्ताला 'आयओए'चे मुख्य कार्यकारी अधिकारी रघुराम अय्यर यांनी दुजोरा दिला आहे. या पुढील तपशील 'ओसीए'च्या वतीने आपल्याला कळवला जाईल, असेही अय्यर म्हणाले.

या स्पर्धेच्या यजमानपदासाठी दक्षिण कोरियाने २०२१ मध्येच आपली इच्छा व्यक्त केली असून, ग्वांगजो आणि दाएगू या शहरांची नावे त्यासाठी प्रस्तावित केली आहेत. याशिवाय मंगोलिया देशानेही आपले स्वारस्य यापूर्वीच दाखवले आहे. अर्थात, या दोन्ही देशांनी अद्याप 'ओसीए'कडे अधिकृतपणे स्वारस्य पत्र सादर केल्याची माहिती नाही. त्यामुळे सध्या तरी भारत या एकमेव देशाचेच स्वारस्य पत्र आल्याचे सांगितले जात आहे. या स्पर्धेच्या यजमानपदाचा निर्णय आगामी दोन वर्षांत घेतला जाईल, असे एका अधिकाऱ्याने सांगितले.

भारताने यापूर्वी १९५१ आणि १९८२ मध्ये नवी दिल्लीत आशियाई क्रीडा स्पर्धेचे आयोजन केले होते. आशियाई क्रीडा स्पर्धेत सहभागी होणाऱ्या देशांची संख्या ऑलिम्पिकच्या तुलनेत कमी असली, तरीही सहभागी खेळाडूंची संख्या आणि समाविष्ट क्रीडा प्रकारांची संख्या या निकषांवर आशियाई क्रीडा स्पर्धा ही ऑलिम्पिकपेक्षाही मोठी ठरते. चीनमध्ये हांगझो येथे २०२३ मध्ये पार पडलेल्या अखेरच्या आशियाई क्रीडा स्पर्धेत, ४० विविध क्रीडा प्रकारांमध्ये ११ हजारहून अधिक खेळाडू सहभागी झाले होते. आगामी स्पर्धा या वर्षी जपानमध्ये आयची-नागोया शहरात होणार आहे. त्यानंतर २०३० मधील स्पर्धा सौदी अरेबियात रियाध आणि २०३४ मधील स्पर्धा कतारमध्ये दोहा येथे होणार आहे.

भारतीय पुरुष संघाचा विजय, महिलांची हार

होर्सेन्स (डेन्मार्क) : भारतीय पुरुष संघाने थॉमस चषक बॅडमिंटन स्पर्धेत कॅनडावर ४-१ असा विजय मिळवून आपल्या मोहिमेला यशस्वी सरुवात केली असली, तरी महिला संघाला उबर चषक स्पर्धेत महिला संघाला डेन्मार्ककडून २-३ असा पराभव पत्करावा लागला.

पहिल्याच सामन्यात लक्ष्य सेनला पराभवाचा सामना करावा लागला. व्हिक्टर लाईने लक्ष्यचे प्रयत्न १८-२१, २१-१९, २१-१० असे हाणून पाडले. दुहेरीत सात्त्विकसाईराज रंकीरेड्डी आणि चिराग शेट्टी जोडीने जोनाथन बिंग त्सान लाई आणि केविन ली यांच्यावर २१-१०, २१-११ असा विजय मिळवून भारताला बरोबरी साधून दिली. आयुष शेट्टीने त्यानंतर ब्रायन यांगला ३९ मिनिटांत २१-१३, २१-१७ असे चकवून भारताला २-१ अशी आघाडी मिळवून दिली. हरीहरन अमसाकरुणन आणि एम आर अर्जुन या दुहेरी जोडीने अलेक्झांडर लिंडेमन आणि नायल याकुरावर २१-७, २१-१५ असा विजय मिळवून ३-१ अशा आघाडीसह भारताचा विजय निश्चित केला. अखेरच्या एकेरीच्या लढतीत किदाम्बी श्रीकांतने जॉश्वा गुयेनला २१-१७, २१-१२ असे हरवले.

महिला संघाला पी. व्ही. सिंधूने पहिल्या एकेरीच्या लढतीत तासभराच्या सामन्यात लिन ख्रिस्तोफरसेनचा २१-१३, १८-२१, २१-१७ असा पराभव करुन आघाडी मिळवून दिली. मात्र, नंतर उन्नती हुडाला लिन कायरस्फेल्डटकडून १२-२१, २३-२५, दुहेरीत प्रिया सोन्जेगबाम-श्रुती मिश्राला ॲमेली कुडस्क-मेटे व्हर्ज जोडीकडून १७-२१, २१-११, २१-२३, दुसऱ्या एकेरीत तन्वी शर्माला ॲमेली शुल्झकडून २१-१९, २१-६, २१-१६ असा पराभव पत्करावा लागला. अखेरच्या दुहेरीच्या लढतीत डेन्मार्कच्या ॲलेक्झांड्रा बोए-ख्रिस्तीन बुश्च जोडीने माघार घेतल्याने भारताच्या तनिशा क्रॅस्टो-पी. व्ही. सिंधूला विजयी घोषित करण्यात आले.

हे पत्र वैदेही ठकार यांनी द इंडियन एक्स्प्रेस (प्रा.) लिमिटेडकरिता (आधीचे नाव - द इंडियन एक्स्प्रेस लिमिटेड) इंडियन एक्स्प्रेस प्रेस, सर्व्हे क्र. २८८, प्लॉट नं. १ व २, रायसोनी इंडस्ट्रीयल पार्क, मु. पो. माण, ता. मुळशी, जि. पुणे ४११०२७ येथे छापून द इंडियन एक्स्प्रेस (प्रा.) लिमिटेड, 'एक्स्प्रेस हाऊस', प्लॉट नं. १२०५/२/६, शिरोळे रस्ता, शिवाजीनगर, पुणे-४११००४ येथे प्रसिद्ध केले. दूरध्वनी- ६७२४१०००. फॅक्स - ६७२४११४७. लोकसत्ता मुंबई कार्यालय : मफतलाल सेंटर, सातवा मजला, रामनाथ गोएंका मार्ग, नरिमन पॉइंट, मुंबई-४०० ०२१. दूरध्वनी : ०२२- २२०२२६२७/६७४४०००० फॅक्स : ०२२-२२८२२१८७. महापे कार्यालय : प्लॉट नं. ईएल १३८, टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, महापे, नवी मुंबई-४००७१०. दूरध्वनी : ०२२-२७६३९९००; फॅक्स : ०२२-२७६३३००८. नागपूर कार्यालय : प्लॉट. न. ३८, ॲडिसन ट्रेड सेंटर, पहिला मजला, डागा ले-आऊट (अंबाझरी) नागपूर-४४००१०. दूरध्वनी : ०७१२-२२३०४२१, २२३६८९७, अहिल्यानगर ०२४१- २४५१९०७, फॅक्स -२४५१६०७. कोल्हापूर ०२३१- २६४४९९४.
■ अध्यक्ष, संचालक मंडळ : विवेक गोयंका ■ कार्यकारी प्रकाशक : वैदेही ठकार ■ संपादक : गिरीश कुबेर ■ निवासी संपादक : सिद्धार्थ केळकर* (*पी.आर.पी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे.) Regd. No. RNI 56975/92 © द इंडियन एक्स्प्रेस (प्रा.) लिमिटेड. सर्व हक्क सुरक्षित. लेखी अनुमतीशिवाय संपूर्ण अथवा अंशतः पुनःप्रकाशनास वा पुनःप्रसारणास मनाई.